नियमित फौ.खटला क्र. ५०/२०१७
नि. क्र. २६ लगत

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांचा सरतपास विद्वान सहा.सरकारी विधीज्ञा श्रीमती एस.आर.वनकर यांचेकडून शपथेवर सुरु.**

**माझे नाव** – विनायक भिकाजी कानसे,

**वय** – ३६ वर्षे, **व्यवसाय** – शेती

**राहणार** – मु.पो.कळबंस्ते, मलदेवाडी, ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी

मी आरोपी आनंद याला सुरेश सिताराम शिरगांवकर यांच्या माध्यमातुन ओळखतो. मी रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा संगमेश्वर येथे २००८ सालापासून पिग्मी एजंट म्हणून काम करत होतो. त्यामुळे माझी सुरेश शिरगांवकर यांची ओळख झाली होती. मी सुरेश शिरगांवकर यांचेकडून सुध्दा पिग्मीची रक्कम गोळा करणेसाठी जात असे. त्यामुळे त्यांची व माझी ओळख झाली. मला सुरेश शिरगांवकर हे म्हणाले की, "तुम्हाला नोकरी लावून दयायचे काम करतो, आपल्याकडे एक माणूस आहे, त्याला बोलावून घेतो". सुरेश शिरगांवकर याने मला सांगितले होते की, तो आनंद वेंगुर्लेकर याला बोलावून घेईल. सुरेश याने दिनांक ०७/१०/२०१४ रोजी आनंद वेंगुर्लेकर याला सुरेश शिरगांवकर याच्या संगमेश्वर येथील दुकानात दुपारी १२.३० ते १२.४५ च्या दरम्यान बोलावून घेतले. सुरेश शिरगांवकर यांनी असेही सांगितले होते की, माझा मुलगा विनायक शिरगांवकर याचेही महसुल विभागात शिपाई पदाची नोकरी लावण्याचे काम आनंद करणार आहे, तो तुझेही काम करेल. दिनांक ०७/१०/२०१४ रोजी आनंद वेंगुर्लेकर हे बोलले की, अशा ठिकाणी म्हणजे नोकरी लागण्यासाठी तुम्हाला पैसे खर्च करावे लागतात. त्यांनी सांगितले की, सुरवातीला

कागदपत्रांसाठी म्हणजे पेपर प्रोसिडींगसाठी रु.६०००/– द्यावे लागतील. लवकरात लवकर पैसे जमा करा, काम लवकरात लवकर होईल असेही ते म्हणाले. मी दिनांक ०७/१०/२०१४ रोजी आनंद याला रोख स्वरुपात रु.६०००/– दिले.

२. दिनांक ०८/१०/२०१४ रोजी मी आरोपी आनंद वेंगुर्लेकर याला माझे काका सोमा रत्ना कानसे यांचे समक्ष सुरेश शिरगावकर यांच्या दुकानाच्या बाजुला असलेल्या बागेत रक्कम रु.१,५०,०००/– रोख स्वरुपात दिले. मी त्याला रक्कम दिल्यावर आरोपी हा माझ्या सोबत बँक ऑफ इंडिया शाखा कसबा इथपर्यंत आला. मी बँकेत गेलो नाही. मी बाहेर थांबलो. आरोपी बँकेत गेला व त्याने ती रक्कम तेथील त्याच्या खात्यात जमा केली. त्यानंतर दिनांक १०/१०/२०१४ रोजी रक्कम रु.१,००,०००/– संगमेश्वर येथील बागेत रोख स्वरुपात दिले. तसेच, दिनांक ११/१०/२०१४ रोजी रत्नागिरी येथे आरोपीच्या घरी मी त्याला रक्कम रु. १,२५,०००/– रोख स्वरुपात दिले. त्यानंतर दिनांक १२/१०/२०१४ रोजी संगमेश्वर येथे मी रक्कम रु.२५,०००/– आरोपीला रोख स्वरुपात दिले. मी दिनांक १३/१०/२०१४ रोजी आरोपीला रक्कम रु.६०,०००/– रत्नागिरी येथे आरोपीच्या घरी रोख स्वरुपात दिले. दिनांक १७/१०/२०१४ रोजी मी रक्कम रु.७५,०००/– आरोपीला रोख स्वरुपात घरी दिले. मी दिनांक १८/१०/२०१४ रोजी आरोपीला रक्कम रु.२५,०००/– रत्नागिरी येथे आरोपीस दिले. मी दिनांक २५/१०/२०१४ रोजी माझे चुलते सोमा रत्ना कानसे यांचे दागिने रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा फणसवणे येथे गहाण ठेवले. त्याचे रक्कम रु.१,२१,०००/– मिळाले. मी त्याच दिवशी ती रक्कम रु.१,२१,०००/– आरोपीला त्याच्या रत्नागिरी येथील घरी दिले. त्यावेळी माझेसोबत माझे चुलते सोमा रत्ना कानसे हेही होती.

३. दिनांक २५/१०/२०१४ रोजी मी आरोपीला विचारल्यावरुन त्याने सांगितले

की, तो माझा चुलत भाउ दिपक कृष्णा झिमण याला सुध्दा महसुल खात्यात शिपाई म्हणून नोकरी लावून देईन. दिपक कृष्णा झिमण हा माझा मानलेला चुलत भाउ आहे. मी त्याच दिवशी दिपक कृष्णा झिमण याला बोलावून घेतले. त्यावर तो आला. आरोपीने आम्हाला सांगितले की, शंभर रुपये दाराच्या प्रत्येकी दोन मुद्रांक कागदावर तुम्हाला सहया दयाव्या लागतील. तो को–या बॉन्डवर सहया करण्यासाठी मला व दिपकला सांगत होता. मी त्याला म्हणालो की, याच्यावर मजकूर टाईप करुन घ्यावा, को–या बॉन्डवर सहया करणे नको. त्यावर तो म्हणाला की, त्याला लागलीच मुंबईला जायचे आहे, आम्ही त्या को–या बॉन्डवर सहया करण्यास त्याने सांगितले. त्यावरुन मी दोन को–या बॉन्डवर सहया केल्या. तसेच दिपक झिमण याने सुध्दा को–या बॉन्डवर सहया केल्या. मी त्याला हेही बोललो होतो की, को–या बॉन्डवर सहया करणे योग्य नाही. त्यावर तो म्हणाला होता की, तुमचे काम होणे आवश्यक आहे, त्यासाठी मला लगेच मुंबईला जायचे आहे. त्यामुळे आम्ही सहया केल्या होत्या. त्या बॉन्डचे पुढे काय झाले याबाबत मला आजपर्यंत समजलेले नाही.

४. मी दिनांक २०/१०/२०१४ रोजी सुध्दा रक्कम रु.५०,०००/– रोख स्वरुपात आरोपीला दिले होते.

५. मी दिनांक २७/१०/२०१४ रोजी रक्कम रु.१४,०००/– आरोपी आनंद याला रोख स्वरुपात संगमेश्वर येथे दिले. त्यानंतर मी पुन्हा एकवेळ आरोपीला रक्कम रु.१४,०००/– दिली होती. ती दुसरी रक्कम रु.१४,०००/– नेमकी कधी दिली याची तारीख मला आठवत नाही, परंतू ती रक्कम मी नोव्हेंबर २०१४ मध्ये दिली होती. मी दिनांक ०१/११/२०१४ रोजी रक्कम रु.१७,४००/– रत्नागिरी येथे रोख स्वरुपात आरोपीला दिले. दिनांक ०६/१२/२०१४ रोजी मी बँक ऑफ इंडिया शाखा कारवांची वाडी, रत्नागिरी येथील आरोपीच्या खात्यावर रक्कम रु.१०,०००/– हस्तांतरीत केले. तसेच मी त्याच

खात्यावर एकदा रक्कम रु.६०,०००/– पाठविले होते. या दोन्ही रक्कमा म्हणजे रक्कम रु.१०,०००/– व रु.६०,०००/– हे मी बँक ऑफ इंडिया शाखा संगमेश्वर येथून पाठविले होते. याच पदध्तीने मी एकवेळ रक्कम रु.१२,०००/–, दुस–या वेळी रक्कम रु.२०००/–, एकदा रक्कम रु.२५,०००/–पाठविले होते. तसेच मी रक्कम रु.१,००,०००/– ही आरोपीच्या बँक ऑफ इंडिया शाखा कारवांची वाडी रत्नागिरी या खात्यावर बँक ऑफ इंडिया शाखा देवरुख येथुन पाठविले होते. त्यानंतर मी रोख स्वरुपात एकदा रक्कम रु.५०,०००/–, एकदा रक्कम रु.१,१०,०००/– अशा रक्कमा रत्नागिरी येथील त्याच्या राहत्या घरी दिल्या होत्या. तसेच मी दिनांक ३०/०३/२०१५ रोजी रक्कम रु.८३,०००/– ही रत्नागिरी येथील त्याच्या घरी रोख स्वरुपात दिली होती. मी दिनांक ०८/०४/२०१५ रोजी रक्कम रु.५०,०००/– ही रत्नागिरी येथील त्याच्या घरी रोख स्वरुपात दिली होती. अशा रितीने दिनांक ०७/१०/२०१४ रोजी ते दिनांक ०८/०४/२०१५ या कालावधीत आरोपी आनंद वेंगुर्लेकर याने आमच्याकडून म्हणजे मी, माझा चुलता सोमा रत्ना कानसे व मानलेला चुलत भाउ दिपक कृष्णा झिमण असे आमच्या तिघांकडून रक्कम रु.१५,६७,२००/– उकळली.

**मध्यतरांनतर पुढील सरतपास तहकुब**

माझेसमक्ष,

BALIRAM DATTATRAYA TARE

Digitally signed by BALIRAM DATTATRAYA TARE
Date: 2022.11.02 17:41:39 +0530

ठिकाण – देवरुख (ब. द. तारे)

दिनांक – ०२.११.२०२२ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांचा पुढील सरतपास विद्वान सहा.सरकारी विधीज्ञा श्रीमती एस.आर.वनकर यांचेकडून शपथेवर सुरु.**

६. त्यानंतर मी मे २०१५ पासून आरोपीच्या पाठीमागे लागलो. मी त्याला विचारत

होतो की, नोकरीचे काय झाले, ऑर्डर आली की नाही. आठ दिवसांनी ऑर्डर येईल, चार दिवस थांबा असे म्हणून तो तारखा वाढवित राहीला व तो मला वेगवेगळे कारणे सांगत राहीला. 'सरकारी काम आहे, थोडा वेळ लागेल', 'साहेब रजेवर आहेत', असे वेगवेगळे कारणे तो सांगत होता. मी त्याला म्हणालो की, मी नातेवाईकांकडून पैसे आणले आहेत, ते लोक मला पैशासाठी विचारत आहेत. काम होते की नाही हे काय ते सांगा असे मी त्याला म्हणालो. त्यावर तो म्हणाला की, काम होईल थांबा. मी त्याला सतत फोन करायचो तर तो फोनसुध्दा उचलत नव्हता. काम होत नसेल तर तसे सांगा पैसे तरी परत करा, असे मी त्याला म्हणालो. त्यावर तो मला म्हणाला की, काम होईल पण तो त्याचा फोन बंद ठेवत होता किंवा उचलत नव्हता. त्यानंतर त्याने मला दिनांक ०५/१०/२०१५, ०७/१०/२०१५, १५/१०/२०१५ व २१/१०/२०१५ रोजी प्रत्येकी रु.२५,०००/– अशी एकूण रक्कम रु.१,००,०००/– माझ्या खात्यावर जमा केली. "काम होईल, वेळ लागेल" असे म्हणून तो टाळाटाळ करत होता. काम शंभर टक्के होईल असे म्हणुन त्यांनतर त्याने पैसे देण्यास सुध्दा टाळाटाळ केली. असे करुन त्याने माझे रक्कम रु.१४,६७,२००/– ची फसवणुक केली. त्याने आजपर्यंत मला नोकरी लावून दिली नाही. मी त्याच्या घरी गेलो तर तो घरी नसायचा. त्याचे घर रेल्वे स्टेशन समोर कुवारबाव रत्नागिरी येथे आहे. तो मला महसुल खात्यात शिपाई पदावर नोकरी देणार होता परंतू त्याने तसे केले नाही. दिपक कृष्णा झिमण व माझी फसवणुक झाल्याचे मला लक्षात आल्याने मी आरोपी विरुध्द दिवाणी दावा दिनांक २९/०८/२०१६ रोजी रत्नागिरी येथील कोर्टात दाखल केला. तसेच मी पोलीस ठाणे येथे दिनांक १९/१०/२०१६ रोजी फिर्याद दाखल केली. मला आता दाखविण्यात आलेली फिर्याद तीच आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावर माझी स्वाक्षरी आहे (सदर फिर्यादला नि.२७ देण्यात आली). मी आरोपी आनंद यशवंत वेंगुर्लेकर याला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

**<u>नि.२८ कडे पारीत केलेल्या आदेशान्वये प्रकरण दिनांक २३/११/२०२२ पर्यंत</u>**

**<u>तहकुब.</u>**

BALIRAM DATTATRAYA TARE
Digitally signed by BALIRAM DATTATRAYA TARE
Date: 2022.11.02 17:41:25 +0530

ठिकाण – देवरुख (ब. द. तारे)

दिनांक – ०२.११.२०२२ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

**CERTIFICATE**

RCC 50.2017

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. S. Jagushte (Jr. Clerk) |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 02/11/2022 |
| Evidence signed by the presiding officer on | : | 02/11/2022 |
| Evidence uploaded on | : | 02/11/2022 |